Reeli

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य याचे कार्यालय,
कोकण भवन, सहावा मजला,
नवी मुंबई ४०० ६१४.
दिनांक :- 12 MAR 2003

12 MAR 2003

कार्यालयीन आदेश क्रमांक ९
=====================

विषय :- जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या लेखा परीक्षण अहवालामध्ये प्राथमिक शिक्षण शाखा व माध्यमिक शिक्षण शाखा असे दोन भाग करणे बाबत.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाची प्राथमिक व माध्यमिक अशी स्वतंत्र शिक्षण संचालनालये आहेत. या दोन्ही खात्यांचा अनुदानाच्या बाबतीत व खर्चाच्या बाबतीत एकमेकांशी संबंध येत नाही. या दोन्ही खात्याचे लेखा आक्षेप लेखा परीक्षण अहवालामध्ये एकत्रित नोंदविल्याने शाकपुर्ततेस होणारा विलंब टाळण्यासाठी खालिल आदेश देण्यात येत आहेत.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या लेखा परिक्षण अहवालातील भाग-दोन मधील आक्षेपांचे वर्गीकरण शासकीय क्षेत्र व स्थानिक क्षेत्र यामध्ये मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० चे कलम ९ प्रमाणे केल्यानंतर प्रथम प्राथमिक शिक्षण शाखेच्या व्यवहाराचे आक्षेप व नंतर माध्यमिक शिक्षण शाखेच्या व्यवहाराचे आक्षेप असे कलम ९[अ],९[ब],९[क] व ९ [ड] खाली आक्षेप वर्गीकृत करण्यात यावेत. अहवालात नोंदविलेल्या आक्षेपांचे अनुषंगाने आवश्यक ती विवरणपत्रे जोडण्यात यावीत. या अहवालाची एक प्रत प्राथमिक शिक्षण शाखेस व एक प्रत माध्यमिक शिक्षण शाखेस अशी स्वतंत्रपणे देण्यात यावी.

12/3/03

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,महाराष्ट्र राज्य,
नवी मुंबई.

प्रत :- १] उपमुख्य लेखा परीक्षक [वरिष्ठ],स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/नाशिक/अमरावती/औरंगाबाद
२] उपमुख्य लेखा परीक्षक,स्थानिक निधी लेखा जिल्हा [सर्व]
३] उपमुख्य लेखा परीक्षक [पंरास],स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई.
४] अधिक्षक [अहवाल/~~पंरास~~]
५] अभिलेखापाल
६] फाईल एल-१-ए-००